महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

नाशिक जिल्ह्यातील धामणगाव,चिचोंडी बु (.ता.येवला) आणि खेडलेझुंगे (ता.निफाड) या ठिकाणी नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण करणेबाबत

(१) २२८ (३०-०४-२०२५). : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील धामणगाव,चिचोंडी बु (.ता.येवला)आणि खेडलेझुंगे (ता.निफाड) या ठिकाणी नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्यासाठी आरोग्य सेवा आयुक्तालयाने दिनांक ५ सप्टेंबर,२०२४ रोजी वा त्या दरम्यान शासनाला प्रस्ताव पाठविलेला आहे , हे खरे आहे काय,

(२)असल्यास, या नवीन उपकेंद्रांची नितांत आवश्यकता असल्यामुळे ही आरोग्य केंद्रे तातडीने मंजूर करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर (११-११-२०२५) :(१) व (२) हे खरे आहे.

(३) जिल्हा स्तरावर प्राथमिक आरोग्य सेवांची उपलब्धता वाढविणे व बळकटीकरण करण्याकरीता लोकसंख्या व अंतराच्या निकषानुसार राज्यात ज्या-ज्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राची आवश्यकता आहे, त्याबाबतची माहिती सर्व जिल्ह्यांकडून मागविण्यात आलेली असून सदरहु माहिती प्राप्त झाल्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र मंजूर करण्यासंदर्भांत एकत्रित धोरणात्मक निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

खानापूर, आटपाडी, तासगाव (जि.सांगली) तालुक्यामध्ये आरोग्य उपकेंद्र उभारण्याबाबत

(२) ११०८ (२८-०४-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर, आटपाडी, तासगाव (जि.सांगली) तालुक्यामध्ये आरोग्य उपकेंद्र होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. आरोग्यमंत्री यांचेकडे दिनांक ०७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पत्रव्यवहारादवारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, येथे आरोग्य उपकेंद्र होण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार खानापूर, आटपाडी, तासगाव तालुक्यामध्ये आरोग्य यंत्रणा बळकट करण्याच्या दृष्टीने तात्काळ आरोग्य उपकेंद्र होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर (११-११-२०२५) :(१) हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हा स्तरावर प्राथमिक आरोग्य सेवांची उपलब्धता वाढविणे व बळकटीकरण करण्याकरीता राज्यात ज्या-ज्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राची आवश्यकता आहे अशा ठिकाणी लोकसंख्येनुसार व अंतराच्या निकषानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र मंजूर करण्यासंदर्भांत बृहद आराखडा सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४)) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात स्वतंत्र आयुष जिल्हा रुग्णालय सुरू करण्याबाबत

(३) २४२५ (३०-०४-२०२५). डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १४ स्वतंत्र आयुष जिल्हा रुग्णालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी अहिल्यानगर, पुणे व नंदुरबार येथे ३० खाटांचे जिल्हा रुग्णालयाचे बांधकाम पुर्ण झालेले असून ठाणे, नागपूर, जालना, बुलढाणा, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, गडचिरोली येथे ५० खाटांचे व जळगांव, वर्धा व गोंदिया येथे ३० खाटांचे आयुष रुग्णालय अद्याप सुरु झालेली नाहीत, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, या रुग्णालयाच्या माध्यमातून आयुर्वेद, युनानी, होमिओपॅथी तसेच योग, निसर्गोपचार आणि वृद्धापकाळातील उपचार देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेचा विस्तार राज्यातील सर्व जिल्ह्यात करून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी याचे एक केंद्र सुरू करण्यात येणार काय ,

(५) असल्यास, सदर रुग्णालयांच्या उभारणीसाठी आणि त्याच्या कार्यप्रणालीसाठी किती निधी मंजूर केला जाणार आहे,

(६) असल्यास, राज्यात स्वतंत्र आयुष जिल्हा रुग्णालय सुरू करणेसंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश आबिटकर (११-११-२०२५): (१) महाराष्ट्रामध्ये राष्ट्रीय आयुष अभियान अंमलबजावणी झाल्यापासून आतापर्यंत टप्या टप्याने १४ स्वतंत्र एकात्मिक आयुष रुग्णालयांना आयुष मंत्रालय भारत सरकार यांच्याकडून वेळोवेळी मंजूर वार्षिक कृती आराखडांतर्गत मंजूरी मिळाली आहे.

(२) राज्यात अहिल्यानगर, पुणे, सिंधुदूर्ग व नंदुरबार येथे ३० खाटांचे एकात्मिक आयुष रुग्णालयांचे बांधकाम पुर्ण झालेले असून तेथे रुग्णसेवा सुरू झालेली आहे. उर्वरीत ठाणे, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, वर्धा, गोंदिया व गडचिरोली वगळता जळगांव, नागपूर, जालना व धाराशिव येथे ५०/३० खाटांचे एकात्मिक आयुष रुग्णालय बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(३) हे खरे आहे.

(४) राष्ट्रीय आयुष अभियाना अंतर्गत महाराष्ट्र राज्यात एकूण १४ एकात्मिक आयुष रुग्णालये मंजूर असून सद्य:स्थितीत चालू वर्ष २०२५-२६ राज्य वार्षिक कृती आराखडयामध्ये एकूण नविन १३ एकात्मिक आयुष रुगणालयांचा प्रस्ताव केंद्र शासनास मंजूरीसाठी सादर केला आहे. उपरोक्त एकात्मिक आयुष रुग्णालये व्यतिरिक्त सद्यस्थितीत राज्यात २६१

आयुष सेवा देणाऱ्या संस्था (आयुष विंग) कार्यान्वित आहेत. यामध्ये २३ जिल्हा रुग्णालये, ०८ महिला रुग्णालये व तालुका स्तारावरील २३० उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालये येथे आयुष विंग कार्यान्वित आहेत.

(५) राष्ट्रीय आयुष अभियाना अंतर्गत आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार ५० खाटांच्या एकात्मिक आयुष रुग्णालयाच्या उभारणीसाठी प्रती रुग्णालय एकूण रुपये १५ कोटी एवढे अनुदान मंजूर करण्यात येते. तसेच या रुग्णालयाच्या आवर्ती खर्चाकरिता प्रती वर्ष एकूण रुपये १ कोटी ५० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. ३० खाटांच्या एकात्मिक आयुष रुग्णालयाच्या उभारणीसाठी प्रती रुग्णालय एकूण रुपये १० कोटी ५० लक्ष एवढे अनुदान मंजूर करण्यात येते. तसेच या रुग्णालयाच्या आवर्ती खर्चाकरिता प्रती वर्ष एकूण रुपये ९० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

(६) सन २०२५-२६ च्या राष्ट्रीय आयुष अभियान राज्य वार्षिक कृती आराखड्यास मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची मान्यता घेण्यात आली आहे. सदर आराखड्यामध्ये बुलडाणा-२ (मेहकर व वरवट बकाल), धुळे, सातारा, सांगली, वाशिम येथे ५० खाटांचे ६ व एकात्मिक आयुष रुग्णालयांचे व बुलडाणा (देउळगांव राजा), कोल्हापूर, लातूर, रत्नागिरी, नाशिक, नांदेड, अकोला येथे ३० खाटांचे ७ एकात्मिक आयुष रुग्णालयांचे अशी एकूण १३ एकात्मिक आयुष रुग्णालयांचे प्रस्ताव मंजूरीकरिता आयुष मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडे सादर करण्यात आला आहे.

यवतमाळ येथील वसंतराव नाईक जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील रिक्त पदे भरणेबाबत

(४) ३११२ (२८-०४-२०२५). श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील वसंतराव नाईक जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात एकूण ८०७ मंजूर पदांपैकी ३७२ पदे रिक्त असल्याने येथील रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर,२०२३ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तसेच येथे अजून ११५० खाटांची गरज आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून या रुग्णालयातील समस्या दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२५) : (१) वसंतराव नाईक जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात एकूण मंजूर ८०७ पदांपैकी ६४२ पदे भरलेली असून १६५ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पदभरतीची प्रक्रिया सुरु असून लवकरच उमेदवार उपलब्ध होणे अपेक्षित आहे. विद्यार्थी व रुग्णहित विचारात घेऊन तूर्तास काही सेवा कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करून घेण्यात आहेत.

(२) श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ येथे अतिरिक्त कार्यरत ५२२ वाढीव रुग्णखाटांना मंजूरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) रुग्णालयातील रिक्त पदे भरण्यासाठी तसेच इतर समस्यांचे निराकरण करण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नागपूर जिल्हापरिषदेतील शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(५) ३६२६ (२८-०४-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

वि.स. १९ (4)

(१) नागपूर जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांच्या एकूण मंजूर ५४ पदांपैकी तब्बल ३२ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (०६-११-२०२५) :(१) हे खरे नाही.

नागपूर जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत विस्तार अधिकारी (शिक्षण) या संवर्गाची एकूण ५४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ३८ पदे कार्यरत असून, १६ पदे रिक्त आहेत.

(२) सदर रिक्त पदे ही सरळसेवेने व पदोन्नतीने प्रचलित शासन नियमातील तरतुदीनुसार वेळोवेळी भरण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

वाशिम जिल्हयातील आरोग्य उपकेंद्राना स्वमालकीच्या इमारती देणेबाबत

(६) ४३०६ (३०-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयात १५३ आरोग्य उपकेंद्र असून तेथे प्रथमोपचार व लसीकरण केले असून मात्र यापैकी ३२ उपकेंद्रांना अद्याप हक्काची जागा व इमारती नसल्यामुळे येथील रुग्ण व कर्मचाऱ्यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन येथील आरोग्य उपकेंद्राना स्वमालकीच्या इमारती देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर (१०-११-२०२५) :(१) हे अंशत खरे आहे.

जिल्हयामध्ये १६१ उपकेंद्र मंजुर असून त्यापैकी १५६ उपकेंद्र कार्यरत आहेत. उर्वरित ५ उपकेंद्रकरिता जागा उपलब्ध नाही. जिल्ह्यात एकुण २७ प्राथमिक आरोग्य केंद्र असून सदरील उपकेंद्र हे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीत कार्यरत आहे. सदरील उपकेंद्राच्या ठिकाणी रुग्णांना नियमित आरोग्य सेवा दिली जाते. उपकेंद्रांना जागा उपलब्ध करुन घेण्याकरिता कार्यवाही सुरु आहे.

(२) सदरील ५ उपकेंद्रांना जागा उपलब्ध करुन देण्याबाबत तालुका आरोग्य अधिकारी यांच्या स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना मागील अनेक महिन्यांपासून वेतन न मिळाल्याबाबत

(७) ४५३१ (०५-०५-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना माहे ऑगस्ट-ऑक्टोबर,नोव्हेंबर २०२४ या तीन महिन्यांपासूनचे तर काही कर्मचाऱ्यांना मागील जिल्हा परिषद पीएफएमएस मार्फत केलेले वेतन नाकारल्याचे तसेच एप्रिल ते जुलै चे वेतन देखील अदयाप मिळाले नसल्याचे माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्याकरिता गेल्या चार-पाच महिन्यांपासून पाठपुरावा करुनही अदयाप कोणतीच कार्यवाही झालेली नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू कर्मचाऱ्यांचे वेतन न मिळाल्याने त्यांच्या कुंटुंबियांवर उपासमारीची वेळ आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी केली आहे काय चौकशीच्या अनुषंगाने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या व प्रश्नाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (२०-११-२०२५) : (१) हे खरे नाही.
(२) अशी बाब नाही, ग्रामपंचायत कर्मचारी यांचे माहे मार्च, २०२५ पर्यंत वेतनासाठी अनुदान प्राप्त झालेले होते व सदरचे अनुदान तालुकास्तरावर वितरित करणेत आलेले असून संबंधितांच्या खात्यामध्ये जमा करण्यात आलेले आहे.काही ग्रामपंचायत सरपंच व उपसरपंच व ग्रामपंचायत कर्मचारी नविन नेमणूक झाली असल्याने त्यांचे वेतन व मानधन आज अखेर प्रलंबित आहे. त्यासाठी जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्याकडून संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, पंचायत राज, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडे अनुदानाची मागणी करण्यात आलेली असून अनुदान प्राप्त होताच प्रलंबित मानधन व वेतन अदा करण्याची कार्यवाही करणेत येत आहे.
(३) अशी बाब नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

दौंड (जि. पुणे) तालुक्यातीलजिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मुख्याध्यापकांची पदे रिक्त असल्याबाबत

(८) ४७०४ (२४-०४-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि. पुणे) तालुक्यामध्ये जिल्हा परिषदेच्या ३६ प्राथमिक शाळांमध्ये ५० टक्यांहून अधिक मुख्याध्यापक नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, माहे जून, २०२४ मध्ये पात्र मुख्याध्यापक पदांसाठी प्रक्रिया राबवून सुद्धा अद्याप नेमणूका झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे जिल्हा वगळता राज्यातील सर्व जिल्ह्यातील शिक्षकांची पदोन्नती झाली असून पुणे जिल्ह्यातील अनेक शिक्षकांना पदोन्नती पासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (०९-०९-२०२५) : (१) (२) (३) व (४) दौंड (जि.पुणे) तालुका अंतर्गत मुख्याध्यापकांची एकूण ४१ पदे मंजूर असून, माहे फेब्रुवारी, २०२५ अखेर मुख्याध्यापकांची २५ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याकरीता सन २०२४-२५ या निवडसूची वर्षामध्ये विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार मुख्याध्यापक पदांसाठी पात्र असलेल्या उपशिक्षक पदाची सेवाज्येष्ठता यादी तयार करण्याचे कामकाज अंतिम टप्प्यात असून, मुख्याध्यापकांची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यामध्ये अवयव दान व प्रत्यारोपणासाठी सक्षम यंत्रणा निर्माण करण्याच्या अनुषंगाने धोरण निश्चित करणेबाबत

(९) ५८३९ (२८-०४-२०२५). श्री.प्राविण विरभद्रया स्वामी (सर) (उमरगा) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अवयव दान व प्रत्यारोपणासाठी सक्षम यंत्रणा निर्माण करण्याच्या अनुषंगाने माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान धोरण निश्चित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागाच्या अधिनस्थ असलेल्या रुग्णालयात समर्पित क्रिटिकल केअर विभागाकरिता २५ महाविद्यालयासाठी १५० प्राध्यापकांची पदे निर्माण करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील पदे अत्यावश्यक सेवेतील असूनही ती अद्याप भरण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (११-११-२०२५) :(१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४)

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय दि.०९.१०.२०२४ अन्वये राज्यातील २५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकरीता एकूण १५० पदे निर्माण करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
त्यानुसार सदर पदांचा आकृतीबंधात समावेश करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

काटोल (जि.नागपूर) एमआयडीसी करिता अधिग्रहित केलेली जमीन मूळ शेतकऱ्यांना परत करण्याबाबत

(१०) ५९९१ (२४-०४-२०२५). श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटोल (जि.नागपूर) एमआयडीसी करिता परिसरातील शेतक-यांनी शासनास सुमारे ३४४ एकर शेतजमीन कोणत्याही प्रकारच्या अधिकच्या प्रलोभनाला बळी न पडता भविष्यात रोजगार निर्माण होईल याकरीता देऊ केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील सुमारे २५ वर्षात सदर जमिनीवर कोणताही मोठा उद्योग तेथे आलेला नसून शेतकऱ्यांची अधिग्रहित केलेली जमीन खाजगी कंपनीला देण्यात येत असल्याने सदर संपादित करण्यात आलेल्या जमीनी बाधित शेतकऱ्यांना परत करण्यात याव्यात अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमआयडीसी, काटोलकरीता अधिग्रहित केलेली जमीन मूळ शेतकऱ्यांना परत करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सचिव, उद्योग विभाग यांचेकडे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०५-०९-२०२५) : (१) व (२) काटोल (जि.नागपूर)येथे विकास केंद्र स्थापण्याकरीता एकूण १३८.४४ हे.आर. जमीन संपादीत करण्यात आली असून, त्यामध्ये ८८ भूखंड आरेखित करण्यात आले आहेत. त्यापैकी ८५ भूखंड उद्योजकांना वाटप करण्यात आलेले असून, त्यापैकी ४३ भूखंडावर उत्पादन सुरू झाले आहे. तसेच २३ भूखंडावर बांधकाम सुरू आहे. ६ भूखंड मोकळे असून, त्यापैकी ३ भूखंड वाटपास उपलब्ध आहेत.

सदर औद्योगिक क्षेत्रात मे. सेपसेट कन्स्ट्रक्शन लि. यांना १०२.७५ हे.आर. जागेचे वाटप सोलर पावर प्लांटसाठी वाटप करण्यात आले असून सदर जागेवर सोलर पावर प्लांट कार्यान्वित आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

तथापि, काटोल विकास केंद्र विकसित करुन उद्योजकांना भूखंड वाटप करण्यात आले आहेत. तसेच अतिरिक्त काटोल औद्योगिक क्षेत्राकरीता खाजगी २१२.११ हे. आर. व सरकारी ६.४९ हे. आर. अशी एकूण २१८.६० हे. आर. जमिन अधिसुचित करण्यात आली असून कलम ३२ (१) प्रमाणे खाजगी १९९.४२ हे. आर. व सरकारी ६.४९ हे.आर. असे एकूण २०५.९१ हे. आर. क्षेत्र अंतिम करण्यात आले आहे. त्यापैकी एकूण १८७.७९ हे. आर. खाजगी क्षेत्राबाबत निवाडा पारित करण्यात आला असून रू.३८.४६ कोटीचे वाटप संबंधित भूधारक शेतकऱ्यांना करण्यात आले आहे. सद्यस्थितीत १७३.०५ हे.आर. क्षेत्र म.औ. वि. महामंडळाच्या ताब्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे कारखेडा (ता.मानोरा, जि.वाशीम) येथील कोल्हापूरी बंधाऱ्यांचे काम अनधिकृतपणे केल्याबाबत

(११) ६०८१ (२४-०४-२०२५). श्रीमती सई डहाके (कारंजा) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कारखेडा (ता.मानोरा, जि.वाशिम) येथील शिवारातील शेत सर्व्हे क्रमांक २५२ ला लागून असलेल्या अरुणावती नदीपात्रात मृद व जलसंधारण विभागामार्फत माहे एप्रिल, २०२४ मध्ये कोल्हापूरी बंधारा बांधण्यासाठी ग्रामपंचायतीची कोणतीही परवानगी घेतली नसल्याने अनधिकृत बांधकामामुळे व शेत बंधाऱ्याच्या अवैध उत्खननामुळे जवळपास निम्या शेततळ्यांचे कायमस्वरूपी नुकसान झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे, काय,

(२) असल्यास, सदर चौकशीची मागणी कारखेडा येथील शेतकरी श्री.चंद्रकांत गजाननराव देशमुख यांनी जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनानुसार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करुण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर बाधित शेतकऱ्यांची झालेली नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय राठोड (१५-१०-२०२५) :(१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) शेतकऱ्यांने शेतात केलेले खोदकाम पुर्ववत करण्याची मागणी कंत्राटदाराकडे केली होती व कंत्राटदाराने संबधित शेतकऱ्यांची मागणी मान्य केली होती. तसेच शेतकऱ्यांचे शेत असलेल्या बंधाऱ्याच्या डाव्या अबटमेंटच्या मागील बाजूचे Backfilling करण्याचे काम पुर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजा बोटोणी (चिंचोणी) (ता.मारेगांव, जि.यवतमाळ) येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करणेबाबत

(१२) ६१५७ (०५-०५-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा बोटोणी (चिंचोणी) (ता.मारेगांव, जि.यवतमाळ) येथे आदिवासी भागात प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करण्यात यावी याकरीता बोटोणी, वागदा, सराटी, घोगुलदरा, धोरदंडा, बुरांडा, खडकी, खंडणी, हटवांजरी, शिवनाळा इत्यादी २० गावांनी ग्रामसभेत ठराव मंजूर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्यासंदर्भात पंचायत समिती, मारेगांव, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनीही कांही वर्षापूर्वी ठराव मंजूर करुन त्यानुषंगाने सविस्तर प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर केलेला

आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावास शासनाने अद्याप मंजूरी दिलेली नसल्यामुळे बोटोणीसह परिसरातील २० गावातील आदिवासी नागरीकांना आरोग्य सेवा मिळण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन बोटोणी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश आबिटकर (११-११-२०२५) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४)
बोटोणीसह परिसरातील रुग्णांना मारेगाव तालुक्यातील वेगाव व मार्डी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फ़त नियमित आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रासंदर्भात नवीन बृहद आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करणेबाबत

(१३) ६२१२ (२४-०४-२०२५). श्री.रवी राणा (बडनेरा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील जे गरीब लाभार्थी ग्रामीण व शहरी भागातील नागरिक आहेत अशा लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री सचिवालय कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांना पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याअनुषंगाने वरील कार्यालयाचे विशेष कार्य अधिकारी यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी वेळ १३:४१ वाजता च्या पत्राद्वारे जिल्हा परिषद अमरावती मुख्य कार्यकारी अधिकारी व सहायक आयुक्त नगर विकास शाखा श्रेणी-१ जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांना निर्देश दिले होते हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर किती घरकुल मंजूर केली वा करण्यात आली आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१२-०९-२०२५) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) होय, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे.
•दिनांक १०/०२/२०२५ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने ग्रामीण भागातील लाभार्थ्यांचे घरकूल मंजूर करण्यात आले आहे.
•अमरावती जिल्ह्यात सन २०१६-१७ ते आज पर्यंत प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत १३८८९० व राज्य पुरस्कृत योजने अंतर्गत सन २०१६-१७ ते आज पर्यंत ५२६९० लाभार्थ्यांना घरकूल मंजूर झाले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

ग्रामपंचायतींचे आर्थिक बळकटीकरण करणेबाबत

(१४) ६३८७ (०५-०५-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचायत राज व इंडियन इंस्टीट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्टेशन ने जाहीर केलेल्या ‘पंचायत विकास निर्देशांक

२०२४' नुसार ग्रामपंचायतींना शासनाकडून मिळणारा निधी कमी झाल्याचे तसेच महाराष्ट्राची या निर्देशांकात दुसऱ्या स्थानावरून चौथ्या स्थानी घसरण झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच, सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून महाराष्ट्रात ग्रामपंचायतींना मिळणारा निधी कमी होत असल्याचे आकडेवारीतून निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील एकूण महसूलांपैकी ग्रामपंचायतींचा वाटा ०.५०% वरुन कमी होऊन ०.४६% झाला असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने राज्यातील ग्रामपंचायतींचे आर्थिक बळकटीकरण करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१४-०८-२०२५) :(१) पंचायत राज व इंडियन इंस्टीट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन यांचे २०२४ चे अहवालानुसार संयुक्त विकास निर्देशांकात महाराष्ट्राचा चौथा क्रमांक आहे. या अहवालानुसार महाराष्ट्र राज्य हे संस्थात्मक रचना (Framework) मध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे व उत्तरदायित्व (Accountability) मध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे. सदर अहवालाच्या निर्देशांक विश्लेषणात नमूद केले आहे की, राज्याने जवळजवळ सर्व निर्देशकांमध्ये चांगली कामगिरी केलेली आहे.
(२) व (३) सदरचे अहवालात तक्ता क्रमांक ६.७ नुसार १५ वा वित्त आयोगाच्या निधीबाबत दिलेल्या आकडेवारीनुसार वित्त आयोगाचा वितरित निधी खालील कारणामुळे कमी होत असल्याचे दिसून येते. राज्यात ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थामधील लोकप्रतिनिधींच्या इ.मा.व. प्रवर्गातील आरक्षणाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात क्र.१९७५६/२०२१ हा दावा दाखल असल्यामुळे तसेच प्रभाग संरचनेबाबत दावा दाखल असल्याने मार्च, २०२२ पासून मुदत संपलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यामध्ये निवडणूका झालेल्या नाहीत. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समित्यामध्ये प्रशासक नियुक्त करण्यात आल्याने १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाचा निधी वितरित करण्यात आलेला नाही.
(४) सदर अहवालात हे ही नमूद करण्यात आलेले आहे की, १५ वा वित्त आयोगाचा निधी वाटप करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. तसेच महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायतींना कर व फी आकारणीबाबत जास्तीत जास्त अधिकार देण्यात आलेले आहेत.

राज्यातील ग्रामपंचायतींचे आर्थिक बळकटीकरण करण्यासाठी खालील उपाययोजना करण्यात येत आहेत. ग्रामपंचायत स्वउत्पन्न वाढविण्यासाठी ५००० लोकसंख्या वरील असलेल्या ग्रामपंचायतीच्या सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

शाश्वत विकास अंमलबजावणीसाठी ध्येय तसेच ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्याबाबत व विविध योजनांचे अभिसरणाबाबत ग्रामपंचायत पदाधिकारी व अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोरपणा (जि. चंद्रपूर) येथे औद्योगिक विकास महामंडळाचे प्रकल्प उभारणेबाबत

(१५) ७०६४ (०५-०५-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरपणा (जि. चंद्रपूर) येथे शासनाची ३२ एकर पडीक जमीनीवर पर्यावरण पूरक असे उद्योग धंदे उभारण्यात यावे अशी मागणी नागरिकाकडून जिल्हा प्रशासनाकडे व शासनाकडे होत असल्याची बाब दिनांक २८ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उद्योग धंद्यामुळे तालुक्यातील आदिवासीबहुल व दुर्गम भागातील बोरगाव बूज, बोरगाव खुर्द, येरगव्हाण, सिंगारपठार, कातलाबोडी आदी गावांना फायदा होणार असल्याने या गावाच्या विकास होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर तालुक्यातील औद्योगिक वसाहत सुरू करणे

बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (१६-०७-२०२५) :(१) कोरपणा (जि. चंद्रपूर) येथे शासनाच्या ३२ एकर पडीक जमीनीवर औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्याकरीता सदर जमिनीचा ७/१२ उतारा, ८-अ व गाव नकाशासह अहवाल सादर करण्याबाबत तहसिलदार, कोरपणा यांना म.औ.वि. महामंडळाच्या प्रादेशिक कार्यालय, चंद्रपूर यांच्या दि.२८/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे,
(२)व (३) प्रस्तुत प्रकरणी तहसिलदार, कोरपणा यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रादेशिक कार्यालय व कार्यकारी अभियंता, म.औ.वि. महामंडळ यांचेकडून प्रस्तावित क्षेत्राची आर्थिक व औद्योगिक सुसाध्यता तपासून घेण्यात येईल. तद्नंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मधील तरतूदी, म.औ.वि. महामंडळाची प्रचलित कार्यपध्दती व बक्षी समितीच्या मार्गदर्शक तत्वानुसार भूसंपादनाची कार्यवाही करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील समस्यांचे निराकरण करणेबाबत

(१६) ७१६९ (०८-०९-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील (मेयो) एमबीबीएसच्या विद्यार्थ्यांच्या जेवणात अळया आढळून आल्या असून येथे शुध्द पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे माहे मे,२०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी विद्यार्थ्यानी वॉर्डन कडे तक्रार करुनही त्याची दखल घेण्यात आली नसल्याने विद्यार्थ्याचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील मेडिकल मधील स्वयंपाकघरामधील (किचन) ३ किंवा ४ स्वयंपाकीवर सुमारे १ हजार रुग्णांच्या स्वयंपाकाचा भार असून सध्या मुख्य स्वयंपाकीसह येथील ४१ पदे रिक्त असल्याने येथील रुग्णसेवेवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन जेवण पुरविणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करणेसह शुध्द पाणी पुरविणे व रिक्त असलेली स्वयंपाकी ही पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२५) :(१) व (२) दिनांक १४ एप्रिल २०२४ रोजीच्या दैनिक वृत्तपत्रात सदर आशयाची बातमी प्रसिद्ध झाली होती. चौकशीअंती मुलींच्या वसतिगृहात अशी घटना घडल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे तात्काळ संबंधित मे. परसोडकर कॅटर्स यांना नोटीस देऊन त्यांची खानावळ बंद करण्यात आली. आता विद्यार्थी असोसिएशन मार्फत नविन कॅटर्सची नियुक्ती केली आहे.
(३) व (४) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील संलग्नित रुग्णालयाच्या पाकगृहासाठी एकूण १०९ पदे मंजूर असून त्यापैकी ५२ पदे भरलेली आहेत. रिक्त पदांपैकी वर्ग ४ ची पदे संस्थास्तरावर व वर्ग ३ ची पदे संचालनालयामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच रुग्णासाठी व विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ व शुद्ध पाणी मिळण्यासाठी वॉटर पुरिफायर, वॉटर कूलरची व्यवस्था करण्यात आली आहे व नियमितपणे स्वच्छता ठेवण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत

(१७) ७४३६ (३०-०७-२०२५). श्री.धनंजय मुंडे (परळी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात झालेल्या आंदोलनानंतर शासनाने दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी या मागण्यांचा विचार करण्यासाठी शासकीय समिती स्थापन केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने आपला अहवाल अद्याप शासनास सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांच्या संघटनांमार्फत यासंदर्भात पत्रव्यवहार, बैठका व वारवांर पाठपुरावा करण्यात आला असून सदर मागण्यांचा सकारात्मक विचार करून निर्णय घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (११-०९-२०२५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) दिनांक १४.०५.२०२५ रोजी शासनस्तरावर झालेल्या बैठकीत समितीचे पुनर्गठन करावे अशी विनंती संघटनेने केली आहे. आवश्यक बदल सुचविण्यासाठी संघटना महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांना पत्र देणार असे बैठकीमध्ये सांगण्यात आले होते. परंतु अद्यापपर्यंत संघटनेने पत्र दिले नसल्याने समितीचे पुनर्गठन होऊ शकले नाही. त्यामुळे समितीची बैठक घेता आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर व गोंदिया जिल्ह्यातील घरकुल योजनेस मंजूरी देण्याबाबत

(१८) ७५२० (२९-०९-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील विविध तालुक्यात प्रत्येक गावात आदिवासी नागरिकांना स्वस्ताचे हक्काचे घरकुल मिळावे याकरिता विविध आवास योजने अंतर्गत घरकुले मंजूर झाली असून योजनेतून निधी मिळत असल्याने लाभार्थींनी घरकुलांची कामे सुरू केली काहींनी पाया रचला, भिंती उभारल्या मात्र या योजनेच्या अनेक लाभार्थ्यांना अद्यापी दुसरा हप्ता न मिळाल्याने ही कामे प्रलंबित असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) तसेच, गोंदिया जिल्हयात केंद्र व राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या प्रधान मंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, मोदी आवास योजना व इतर घरकुल योजनेअंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांसाठी शासनाकडून वेळेत रकमेचा हप्ता मिळत नसून बांधकामास आवश्यक असणारी रेती ही उपलब्ध होत नसल्याने बांधकामास अडचणी निर्माण होत असल्याचे माहे एप्रिल,२०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर दोन्ही जिल्हयातील घरकूल योजनेस शासनाकडून विहित वेळेत अर्थसहाय्य तसेच रेती उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१९-११-२०२५) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हयातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत एका विधानसभा क्षेत्राला वगळण्यात आल्याबाबत

(१९) ७५२३ (२९-०९-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा

खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ (बॅच १) संशोधन व विकास **योजनेंतर्गत** उपसचिव, ग्रामविकास विभाग यांच्या स्वाक्षरीने काढण्यात आलेल्या दिनांक १८ जुलै, २०२४ च्या परिपत्रकादवारे रत्नागिरी जिल्हयातील १२१ कि.मी. लांबीचे रस्ते मंजूर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ते मंजूर करताना केवळ २६४ गुहागर विधानसभा क्षेत्रातील एकही रस्त्याचे काम समाविष्ट करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेतून रस्ते मंजूर करताना जिल्हयातील केवळ एका विधानसभा क्षेत्राला वगळण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना यांना दिनांक ७ फेब्रुवारी, २०२५ रोजी तसेच दिनांक ७ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास पाठविलेल्या स्मरणपत्रावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) असल्यास, सदर योजनेतून एका विधानसभा क्षेत्राला जाणीवपूर्वक वगळण्यात आले असल्यास याबाबत चौकशी करून संबंधितावर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (२०-११-२०२५) :(१), (२) , (३), (४) व (५) मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ (बॅच-१) (संशोधन व विकास) योजनेस दि.१५ फेब्रुवारी, २०२४ रोजी मान्यता देण्यात आली आहे. सदर योजने अंतर्गत दर्जोन्नतीसाठी रस्ते विकास आराखड्यानुसार राज्यातील अस्तित्वात असलेल्या इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग रस्त्यांची एकुण लांबी व त्या जिल्ह्यातील/तालुक्यातील इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यांची लांबीच्या प्रमाणात ज्या ग्रामीण रस्त्यांवर जास्त वर्दळ आहे, अशा रस्त्यांचा प्राधान्याने विचार करण्यात आला आहे. त्यानुषंगाने संशोधन व विकास योजनेंतर्गत सदर रस्ते मंजुरीस मान्यता प्रदान करण्याचे अधिकार शासन स्तरावर आहेत. सदर अधिकारांतर्गत शासन मान्यतेने मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ (बॅच-१) संशोधन व विकास योजनेंतर्गत दि.१८ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये रत्नागिरी जिल्ह्यातील एकूण १२०.५४५ कि.मी. लांबीच्या ३९ रस्ते कामांना मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

शिवणे (ता. हवेली, जि.पुणे) गावातील वैद्यकीय उपकेंद्र बंद असल्याबाबत

(२०) ७५७१ (२९-०९-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवणे (ता. हवेली, जि.पुणे) गावातील जिल्हा परिषदेअंतर्गत असलेले वैद्यकीय उपकेंद्र वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी न मिळाल्याने बंद ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपकेंद्रामध्ये कार्यरत असलेल्या वैद्यकीय सेवक व समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी राजीनामा दिल्याने केंद्र हे पूर्णपणे कर्मचाऱ्यांविना असल्याने नागरिकांना आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागत असल्याप्रकरणी आरोग्य विभागाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांची नियुक्ती सन २०११ च्या जनगणनेनुसार करून आजतागायत लोकसंख्येत पाचपट वाढ होऊनही नव्या पदांची निर्मिती व भरती न झाल्याने आरोग्य सेवांचा दर्जा खालावला असल्याने याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, शिवणे व त्यासारखी काही गावे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट होऊनही आरोग्य सेवा जिल्हा परिषदेकडेच असल्याने समन्वयाचा अभाव निर्माण झाल्याचे निदर्शनास येत आहे अशा परिस्थितीत आरोग्य सेवेच्या जबाबदारीचे स्पष्ट विभाजन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे,

(५) असल्यास, वैद्यकीय उपकेंद्र बंद असल्याने गर्भवती महिला, लहान मुले, वयोवृद्ध नागरिक यांना वेळेवर उपचार मिळत नसल्याने आरोग्याचे प्रश्न निर्माण झाल्याने त्यांना तात्काळ सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही

केली,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार स्थानिक ग्रामस्थांनी उपकेंद्र हे महापालिकेच्या अखत्यारीत आणण्याची मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आह, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (२८-१०-२०२५) :(१), (२), (३), (४), (५) आणि (६)

जिल्हा परिषद पुणे अंतर्गत शिवणे वैद्यकिय उपकेंद्रासाठी स्वतंत्र इमारत नसल्याने, ते ग्रामपंचायतीने उपलब्ध केलेल्या पर्यायी जागेवर सुरु आहे. उपकेंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी हे पद एप्रिल २०२५ व आरोग्य सेविका हे पद जून २०२२ पासून रिक्त आहे.

नगरविकास विभागाच्या शासन निर्णय दि. ०४.१०.२०१७ अन्वये ११ गावे पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट केली आहेत. त्यामध्ये शिवणे हे गाव समाविष्ट आहे. पुणे महानगरपालिकेने एप्रिल २०२३ पासून नवजीवन हायस्कूल शेजारी आयुष्यमान आरोग्य मंदिर शिवणे कार्यान्वीत केले असून, वैद्यकीय अधिकारी आणि इतर ४ कर्मचारी यांचेमार्फत नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध केली आहे.

नगरविकास विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०४.१०.२०१७ व ३०.०६.२०२१ अन्वये एकूण ३४ गावांचा समावेश पुणे महानगरपालिका क्षेत्रात झाला आहे. सदर गावांमध्ये ३ प्रा.आ.केंद्र व १८ उपकेंद्रांचा समावेश असल्याने सदर संस्था हवेली तालुक्यातील ग्रामीण भागात स्थलांतरित करणेचा प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांना दिनांक २०.०५.२०२२ रोजी सादर केला आहे. सदरचा प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा कार्यालयाकडून दिनांक १४.०९.२०२३ रोजी अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

उपकेंद्र शिवणे येथील समुदाय आरोग्य अधिकारी व आरोग्य सेविका ही पदे रिक्त असले तरी पुणे महानगरपालिकेच्या अयुष्यमान आरोग्य मंदिर शिवणे मार्फत आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच पुणे महानगरपालिका यांच्या दि.०९.१०.२०२४ रोजीच्या आदेशान्वये मे. निरामय संस्था, पुणे यांना आरोग्य सेवांतर्गत लसीकरणासाठी आदेशित केले असून त्या ठिकाणचे गर्भवती महिला, लहान मुले यांचे लसीकरण करण्यात येत आहे.

कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई येथील भूखंड म्हाडाने महाराष्ट्र कल्याण कामगार मंडळाला हस्तांतरीत केल्याबाबत

(२१) ७५९२ (३०-०७-२०२५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई येथील जलतरणासाठी राखीव असलेला भूखंड म्हाडाने जलतरण तलावासाठी महाराष्ट्र कल्याण कामगार मंडळाला माहे जानेवारी, १९९८ मध्ये हस्तांतरीत करण्यात आला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामगार मंडळाने जलतरण तलावाच्या भूमीपुजनाचा कार्यक्रम दिनांक २८ जून, १९९८ रोजी वा त्या दरम्यान मा. तत्कालीन उद्योग मंत्री व तत्कालीन कामगार मंत्री यांच्या हस्ते जलतरण तलावाचे उद्घाटन झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरच्या जलतरण तलावाचे भूमीपुजनाच्या कार्यक्रम पुन्हा १५ वर्षानंतर म्हणजे दिनांक ३१ऑगस्ट,२०१४ रोजी वा त्या सुमारास तत्कालीन कामगार राज्यमंत्री यांच्याहस्ते करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त भूमीपुजनाच्या कार्यक्रम प्रत्येकवेळी करण्याची कारणे काय आहेत ,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी आली आहे काय, त्याअनुषंगाने सदरच्या भूखंडावर जलतरण तलाव करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर (०९-०९-२०२५) : (१) (२) (३) हे खरे आहे.

(४) म्हाडाने दि.०२ जुलै १९९८ रोजी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास भूखंडाचा ताबा दिल्यानंतर दि.२८ जून १९९८ रोजी तत्कालिन मा. उद्योग मंत्री, मा. कामगार राज्यमंत्री तथा महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे अध्यक्ष आणि इतर मान्यवरांच्या हस्ते जलतरण तलावाचा शिलान्यास समारंभ संपन्न झाला होता.

या भूखंडाचे वितरण करताना बृहन्मुंबई महापालिककडून नाट्यगृहाचे आरक्षण बदलून घेण्याची जबाबदारी म्हाडाने मंडळावर टाकली होती. तसेच भूखंडाचा ताबा घेतल्यापासून दीड वर्षात जलतरण तलावाचे बांधकाम करण्याची अट घालण्यात आली होती. या अटींची पूर्तता न झाल्यामुळे म्हाडाने दि.१४ मार्च २००५ रोजी भूखंडाचा एकतर्फी ताबा घेतला होता. त्यानंतर तसेच लोकप्रतिनिधींच्या मंडळ प्रशासन पाठपुराव्यानंतर ११ मार्च २०१४ रोजी म्हाडाने या भूखंडाचा पुनःताबा महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास दिला. भूखंडाचा पुनःताबा मिळाल्यानंतर तत्कालिन कामगार राज्यमंत्री तथा महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे अध्यक्ष व स्थानिक आमदार यांच्या उपस्थितीत दि.३१ ऑगस्ट २०१४ रोजी सदर जलतरण तलाव कार्याच्या शुभारंभाचा उद्घाटन कार्यक्रम झाला आहे.

(५) या भूखंडावर जलतरण तलाव बांधणेकरिता ठेकेदार नियुक्तीकरीता ई-निविदा प्रक्रिया राबवून ऑगस्ट २०१९ मध्ये शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावात शासन मान्यता मिळण्यापुर्वी कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर निविदा प्रक्रिया रद्द करावी लागली होती. दरम्यान लोकलेखा समितीने केलेल्या शिफारशीनुसार म्हाडाने या भूखंडाचे २०१७ मध्ये लागू असलेल्या रेडी रेकनर दरानुसार महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे भुईभाडे, विधी शुल्क इत्यादी मिळून एकूण रु.१९,५१,५५,८३१/- रकमेची मागणी केली होती. सदर रक्कम भरणे मंडळाला शक्य नसल्याने गृहनिर्माण विभागाकडून या भूखंडाचे वितरण रद्द करण्यात आले असल्याचे म्हाडाने दि.०७ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या मंडळास कळविले आहे.

आरक्षण न बदलता मंडळास भूखंड वितरित करण्याची चूक म्हाडाने केलेली असून कोणतेही अतिरिक्त भुईभाडे न आकारता हा भूखंड मंडळाकडे राहावा, याकरिता लोकलेखा समितीस वस्तुस्थिती सादर करण्याच्या सूचना मा. कामगार मंत्री यांनी दि.२३ जुलै २०२४ रोजीच्या बैठकीत दिल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

केरवाडी ते सिरपूर (ता.पालम, जि.परभणी) या रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

(२२) ७९१३ (३०-०७-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केरवाडी ते सिरपूर (ता.पालम, जि.परभणी) या रस्त्याचे काम गेल्या अडीच वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या कामासाठी निधीची तरतूद न करताच मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून सदर रस्त्याच्या कामाला मंजूरी देण्यात आली असून कार्यारंभ आदेशही देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या दुर्लक्षामुळे पालम तालुक्यातील ६ गावांना दरवर्षी पावसाळ्यात पायी प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय त्याअनुषंगाने सदर रस्त्यांची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करणेबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१०-०९-२०२५) : (१), (२) व (३) मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ अंतर्गत दि.१० मार्च,

२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रRामा-१६ ते सिरपूर ता. पालम किमी. ०/०० ते ३/१०० (Package No. ADB-PAR-११-०१) हा रस्तास आशियाई विकास बँक (ADB) अर्थसहाय्य अंतर्गत मंजूरी देण्यात आली आहे. सदर कामाचे कार्यारंभ आदेश दि. ३०.१०.२०२३ रोजी देण्यात आले असून कामाची मुळ मुदत दि.२९.०४.२०२५ पर्यंत होती. काम सुरु केल्यानंतर जमिनवादामुळे कामास विलंब झाला आहे. सद्यस्थितीत मातीकाम, Subgrade, GSB चा पहिल्या थराचे काम झाले आहे.
सदरील रस्त्याचे subgrade-Lime Stabilization व GSB- एका थराचे व ५ नळकांडी पुलाचे काम पूर्ण झाले असल्यामुळे रस्ता वाहतुकीस सुरळीत आहे.
(४) संबंधीत कंत्राटदार यांनी सदर रस्त्याचे काम विहित वेळेत पूर्ण केले नसल्याने, प्रतिदिन रु.७०००/- दंड प्रस्तावित करण्यात आला असून सदरचे काम माहे डिसेंबर-२०२५ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात उद्योग विभागामार्फत करण्यात आलेल्या गुंतवणूकीबाबत

(२३) ७९३७ (३०-०७-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या उद्योग विभागामार्फत मागील ५ वर्षात आतापर्यंत किती गुंतवणूक झाली आहे,
(२)असल्यास, आतापर्यंत MOU (Memorundam Of Understanding) झालेल्यांपैकी विदर्भात तसेच अमरावती विभागात किती गुंतवणूक झाली आहे.
(३) तसेच, गुंतवणूक करणाऱ्या उद्योजक कंपन्या कोणत्या आहेत व शासनाने प्रकल्प उभारणीबाबत कोणते नियोजन केले वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०६-११-२०२५) : (१), (२) व (३)
राज्यात दि.०१.०४.२०१९ पासून आजतागायत ४०५ मोठे, विशाल, अतिविशाल तसेच उच्च तंत्रज्ञानावर आधारित अतिविशाल प्रकल्पांना देकार पत्र देण्यात आले असून, त्याद्वारे राज्यात आगामी कालावधीत रूपये ११,२८,०४४/- कोटी एवढी गुंतवणूक होणार असून त्याद्वारे ५,६२,१४४ एवढी रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

मागील ५ वर्षात उद्योग विभागामार्फत राज्यात रु. १९,६२,०८५ कोटीच्या गुंतवणूकीचे २४६ सामंजस्य करार करण्यात आले आहेत. या माध्यमातून १४ लक्ष इतका रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. उपरोक्त सामंजस्य करारांतून विदर्भातील ५८ उद्योग घटकांसमवेत सामंजस्य करार झाले असून त्यामधून सुमारे रु. ६,८४,५१९ कोटींची गुंतवणूक असून यातून १,८२,५०९ इतका रोजगार होणे अपेक्षित आहे. त्यापैकी अमरावती भागात ९ उद्योग घटकांशी सामंजस्य करार झाले असून रक्कम रु.३,४२६ कोटींची गुंतवणूक व ५,२२० रोजगार होणे अपेक्षित आहे. सदर उद्योजक कंपन्यांमध्ये सोलर पीव्ही मॉड्युल, सेमीकंडक्टर, वेफर्स, अवकाश व संरक्षण साहित्य, लिथियम आयन बॅटरी, केमिकल व पॉलिमर्स या क्षेत्रातील उद्योगांचा समावेश आहे.

विदर्भामध्ये औद्योगिकीकरणासाठी वाव असणा-या कापड उद्योग, अन्न प्रक्रिया उद्योग व संरक्षण व अवकाश क्षेत्रातील गुंतवणूकीला चालना देण्यासाठी विशेष समर्पित धोरण आखण्यात आली आहेत. मराठवाडा / विदर्भासाठी रोजगारावर आधारित मोठया विशाल अतिविशाल प्रकल्पांसाठी किमान गुंतवणूकीचा तसेच रोजगार निर्मितीसाठीचा किमान मर्यादा राज्याच्या इतर भागापेक्षा कमी आहे. तसेच सामुहिक प्रोत्साहन योजना सन २०१९ अतर्गत सुक्ष्म लधु व मध्यम तसेच मोठया व विशाल प्रकल्पांना आकर्षित करण्यासाठी अतिरिक्त् वित्तीय प्रोत्साहने व प्रोत्साहने उपभोगण्यासाठी अधिकचा कालावधी दिलेला आहे.

राज्यात महाराष्ट्र औद्यागिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात प्रस्तावित उद्योगांना महामंडळामार्फत रस्ते विज पाणी मलनिस्सरण इ. पायाभुत सुविधांनी युक्त असे विकसित भुखंड रास्त दराने पुरविले जातात. नवीन उद्योग सुरू करण्यासाठी करण्यात येणारी भूखंड वाटप प्रक्रिया संपूर्णत: संगणीकृत असून नवीन उद्योगांना देण्यात येणाऱ्या सर्व परवानग्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या एक खिडकी प्रणालीव्दारे उपलब्ध करुन देण्यात येतात. रु.५०

कोटीच्या वर गुंतवणुक असलेल्या देशांतर्गत उद्योग तसेच विदेशी गुंतवणूकदारांना २० पेक्षा अधिक विभागाच्या १०० हून अधिक परवानग्या महा परवाना या एक खिडकी प्रणालीव्दारे मुदतबंद स्वरुपात देण्यात येतात. उद्योग विभागामार्फत उद्योगाकरीता उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या सुविधांमुळे गुंतवणूक स्नेही वातावरण निर्माण झाले असून त्यामुळे अमरावती सह विदर्भात सर्व भागात उद्योगधंदयाची वाढ होत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजा धाबा (ता.गोंडपिपरी,जि.चंद्रपूर) येथील श्री संत परमहंस कोंडय्या महाराज देवस्थानाला 'ब' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा देणेबाबत

(२४) ८०३७ (३०-०७-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा धाबा (ता.गोंडपिपरी,जि.चंद्रपूर) येथील श्री संत परमहंस कोंडय्या महाराज देवस्थानाला 'ब' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (राजूरा) यांनी मा.पर्यटन मंत्री यांना दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयकुमार गोरे (१७-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) मौजा धाबा ता.गोंडपिपरी,जि.चंद्रपूर येथील श्री संत परमहंस कोंडय्या महाराज देवस्थानाला 'ब' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा देणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडून दिनांक०२.०६.२०२५रोजीच्या पत्रान्वये या विभागास दिनांक २२.०९.२०२५ रोजी मेल व्दारे प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावामधील त्रुटींची पुर्तता करणेबाबत या विभागाकडील दिनांक २२.०९.२०२५ रोजीच्या पत्राव्दारे जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना कळविण्यात आले आहे. सदर प्रस्तावमधील त्रुटींची पुर्तता केल्यानंतर ब वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देणेबाबतची कार्यवाही करणे शक्य आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मारई पाटण (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथील देवस्थानाला 'ब' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा देणेबाबत

(२५) ८०३८ (३०-०७-२०२५). श्री.देवराव भोंगळे (राजूरा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मारई पाटण (ता.जिवती, जि.चंद्रपूर) येथील देवस्थानाला 'ब' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा देणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (राजूरा) यांनी मा.पर्यटन मंत्री यांना दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनद्वारे मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१७-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) मारई पाटण देवस्थान ता.जिवती, जि.चंद्रपूर या देवस्थानाला 'ब' वर्ग तिर्थक्षेत्राचा दर्जा देणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे कडून दि. ०२.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये या विभागास दि. २२.०९.२०२५ रोजी मेल व्दारे प्राप्त झाला आहे. या विभागाकडील दि. २२.०९.२०२५ रोजीच्या पत्राव्दारे सदर प्रस्तावामधील त्रुटींची पुर्तता करणेबाबत जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना कळविण्यात आले आहे. प्रस्तावमधील त्रुटींची पुर्तता केल्यानंतर ब वर्ग दर्जा देणेबाबतची कार्यवाही करणे शक्य आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

शहापूर (जि. ठाणे) तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील विकासकामे निकषांमधून डावल्याबाबत

(२६) ८१९३ (३०-०७-२०२५). श्री.दौलत दरोडा (शहापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जिल्हा ठाणे) तालुक्यातील ११० ग्रामपंचायतींनी कार्यक्षेत्रातील विकास कामासाठी जन सुविधेचा निधी मागितला असून जिल्हा परिषदेने योजनेच्या पात्रतेसाठी लागणाऱ्या निकषांनुसार न देतां तालुक्यातील ४५ ते ५० ग्रामपंचायतींनाच निधी मंजूर केला असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीतून गावांतील अंतर्गत रस्ते, ग्रामपंचायत कार्यालय विस्तारीकरण, स्मशानभूमी, ग्रामपंचायत कार्यालय सुशोभिकरण तसेच काही नागरिकांच्या घरांकडे जाणाऱ्या रस्त्यांसाठी निधी देण्यात येणार होता पण त्यापैकी उर्वरित ६० ते ७० ग्रामपंचायतींना वगळण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात यावी अशी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे उपजिल्हाधिकारी यांचेकडे तेथील ग्रामस्थ व राजकीय पक्ष कार्यकर्त्यांनी केल्यावर, त्याबाबत जनसुविधेची कामे मंजूर करतांना ग्रामपंचायतींकडून याद्या मागविल्या असून अशी कामे अन्य काही महसुली गावांत प्रस्तावित असतील तर त्याची माहिती घेण्यात येईल, असे मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१०-०९-२०२५) : (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

दिनांक ०७.०४.२०२५ रोजीची तक्रार जिल्हा परिषद ठाणे कार्यालयास प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने जिल्हा परिषदेने केलेल्या केलेल्या कार्यवाहीबाबत तक्रारदारास कळविण्यात आलेले आहे.

जिल्हा नियोजन समिती कार्यालय, ठाणे यांचेकडुन उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययाचे अनुषंगाने ठाणे जिल्हयातील सन २०११ च्या जनगणनेनुसार ग्रामिण लोकसंख्येच्या प्रमाणात उपलब्ध निधीची तालुका निहाय विभागणी केली असता शहापूर तालूक्यासाठी रु. ८.५० ते ९ कोटी रक्कमेच्या विकास कामांना मान्यता देय होते.

सन २०२४-२५ साठी शहापूर तालुक्यातील ११० ग्रामपंचायतींपैकी १०० ग्रामपंचायतींनी ४५२ विकासकामांची मागणी केलेली होती. या मागणीसंदर्भात, या संबंधिच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार छाननी करुन उपलब्ध होणा-या रु.९.१२ कोटी निधीतून, एकूण ७९ ग्रामपंचायतीच्या एकूण १३३ कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे. सन २०२५-२६ करीता ग्रामपंचायतींच्या मागणीनुसार प्राप्त प्रस्तावांची पडताळणी करुन २०२५-२६ च्या आराखडयामध्ये समावेश करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात रुग्णांच्या सोयीसाठी क्युआर कोड प्रक्रिया राबविणेबाबत

(२७) ८४३८ (०८-०९-२०२५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांत रुग्णांना बाहयरुग्ण विभागाचे कार्ड काढण्यासाठी तासन-तास रांगेत उभे राहावे असल्याने रुग्णांच्या सोयीसाठी त्यांची नोंदणी क्युआर कोड स्कॅन करुन होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशभरातील नागरीकांसाठी आयुष्मान भारत हेल्थ अकाऊंट नंबर कार्ड (आभा) नोंदणीची प्रक्रिया सुरु असून हे कार्ड असलेल्यांसाठी वैद्यकीय शिक्षण खात्याकडून सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील रुग्णालयात क्युआर कोड मेडीकल कॉलेज, नागपूर मार्फत नोदणीचा पथदर्शी प्रकल्प सुरु करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने माहिती घेऊन राज्यात क्युआर कोड प्रक्रिया राबविण्यात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, त्यामागीली कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२५) : (१) होय.
(२) होय.
क्युआर कोड नोंदणीचा पथदर्शी प्रकल्प शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर तसेच सर ज.जी. समूह रुग्णालये, मुंबई या दोन्ही संस्थामार्फत सुरु करण्यांत आला आहे.
(३) वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागाने नेक्स्टजेन ई हॉस्पिटल मॅनेजमेंट प्रणाली लागू केलेल्या ५२ रुग्णालयांपैकी प्रत्येकासाठी आरोग्य सुविधा व्यवस्थापकांची नियुक्ती केलेली आहे. या सुविधा व्यवस्थापकांनी त्यांच्या संबंधित रुग्णालयांसाठी HHD (आरोग्य सुविधा आयडी) तयार केले आहेत. शिवाय, या HFID च्या ब्रिज मॅपिंग सध्या आरोग्य माहिती प्रदात्या (HIP) म्हणजेच नेक्स्टजेन ई हॉस्पिटल मॅनेजमेंट सिस्टम सोबत प्रक्रियेत आहे.
आयुक्त, वैद्यकीय शिक्षण आणि शासन यांनी QR कोडसाठी ABDM स्कॅन आणि शेअर कार्यक्षमता सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केलेल्या आहेत. एबीडीएम स्कॅन आणि शेअर क्यूआर कोड कार्यक्षमता लागू करण्यासाठी विभाग साप्ताहिक आढावा घेत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील आरोग्यसेवक पद रिक्त असल्याबाबत

(२८) ८७८२ (३०-०७-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने आरोग्यसेवक (पुरुष) पदाच्या ५० टक्के कोटयातील १२६ जागांकरिता दिनांक ५ ऑगस्ट, २०२३ रोजी वा दरम्यान जाहिरात प्रसिध्द करुन सुमारे पावणेदोन वर्षाचा कालावधी होऊनही भरती प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (०९-०९-२०२५) : (१) व (२) जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत दि.०५ ऑगस्ट, २०२३ रोजी आरोग्य सेवक (पुरुष) पदाच्या ५० टक्के कोट्यातील १२६ जागांकरीता पदभरतीची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर १२६ पैकी १२२ पदांची पदभरती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील आदेश दि.६.६.२०२५ अन्वये करण्यात आली असून संबंधित उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. सहाय्यक संचालक, नाशिक यांचे दि.२०.०५.२०२५ च्या पत्रानुसार, उर्वरीत ४ उमेदवार हे हंगामी फवारणी कर्मचारी प्रमाणपत्र पडताळणीत अपात्र झाल्याने निवड यादीतील गुणांकानुसार ४ उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात पंतप्रधान आवास घरकुल योजनांच्या अनुदानात वाढ करणेबाबत

(२९) ९०७७ (२९-०९-२०२५). श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.सचिन पाटील (फलटण), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.प्रतापराव

पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात पंतप्रधान आवास घरकुल योजनेअंतर्गत ५ हजार ७०० तसेच पी.एम.किसान जनधन, आदिम (आदिम जमाती विकास योजना), रमाई आवास आणि शबरी घरकुल योजनेअंतर्गत ७ हजाराहून अधिक घरकुले मंजूर झाली आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात घरांचे बांधकाम सुरु केल्यानंतर लाभार्थ्यांना बांधकाम साहित्याचे भाव, पाणीटंचाई अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घरे बांधण्यासाठी शासन १ लाख २० हजार रुपयांचे अनुदान अपुरे असल्याने त्यासाठीच्या अनुदानाची रक्कम वाढविण्यात यावी अशी मागणी लाभार्थ्यांकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर योजनांसाठीचे अनुदान वाढविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१९-११-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) दि. २० मार्च, २०२५ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण टप्पा-२ तसेच विविध राज्यपुरस्कृत ग्रामीण घरकुल योजने अंतर्गत, सन २०२४-२५ मध्ये प्राप्त उद्दिष्टामधील मंजूर घरकुल लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानात राज्य हिश्श्यातून रु. ५०,०००/- एवढी अतिरिक्त वाढ करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
या रु. ५०,०००/- रक्कमेमधून रु. ३५,०००/- अनुदान हे घरकुल बांधकामासाठी तर, रु. १५,०००/- इतके अनुदान हे प्रधानमंत्री सुर्यघर योजनेतून छतावर १ KW मर्यादेपर्यंत सौर उर्जा यंत्रणा उभारणी करिता केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदाना व्यतिरिक्त अतिरिक्त अनुदान अनुज्ञेय राहील. जे लाभार्थी सौर उर्जा यंत्रणा उभारणी करणार नाहीत त्यांना सदरील रु. १५,०००/- अनुदान देय असणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात पुस्तकांचे गाव व कवितेचे गाव सुरु करण्याबाबत

(३०) ९७५२ (३०-०७-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात पुस्तकांचे गाव व कवितेचे गाव करण्यात येणार असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आतापर्यंत किती जिल्ह्यात पुस्तकांचे गाव आणि कवितेचे गाव निर्माण केले व ज्या जिल्ह्यात अद्यापपर्यंत पुस्तकांचे व कवितेची गाव निर्माण केले नाही त्या जिल्ह्यात पुस्तकांचे व कवितेचे गाव तात्काळ करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,
(३) तसेच, राज्यातील सीमावर्ती भागामध्ये मराठी भाषांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असल्याने या भागात मराठी भाषेची केंद्र उभारत असतानाच या सर्व सीमा भागात पुस्तकांचे गाव व कवित्यांची गावे विशेष बाब म्हणून निर्माण करण्यासाठी कोणता विशेष निधी देऊन स्थानिक नागरिकांना येथे रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्या अनुषंगाने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०९-०९-२०२५) : (१) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात पुस्तकांचे गाव/कवितांचे गाव सुरु करण्यात येणार आहे.

(२) मराठी भाषेचा विकास, प्रचार, प्रसार, संवर्धन व वाचन संस्कृतीची जोपासना व्हावी या दृष्टीने "पुस्तकांचं गाव" भिलार, या योजनेच्या यशाच्या पार्श्वभूमीवर मराठी भाषा विभागाच्या दिनांक ०४.०१.२०२२ च्या शासन निर्णयान्वये "पुस्तकांचे गाव" ही योजना संपूर्ण महाराष्ट्रात विस्तारित स्वरुपात करण्याचे जाहीर करण्यात आले आहे. मराठी भाषा विभागाच्या दिनांक २५.०३.२०२२ च्या शासन निर्णयान्वये या योजनेमधील पहिल्या टप्यात औरंगाबाद महसूल विभाग, नागपूर महसूल विभाग, कोकण विभाग व पुणे महसूल विभाग या ०४ महसूली विभांगातून अनुक्रमे वेरुळ, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद, नवेगाव बांध, ता.अर्जुनी-मोरगाव, जि. गोंदिया, पोंभुर्ले ता. देवगड जि. सिंधुदुर्ग व अंकलखोप (औंदुबर) ता. पलूस, जि. सांगली ही ०४ गावे निश्चित करण्यात आली आहेत. तसेच तद्नंतर मराठी भाषा विभागाच्या दिनांक २०.०८.२०२४ च्या शासन निर्णयान्वये पुस्तकांच गाव योजना विस्तार अंतर्गत नाशिक महसुल विभागातील अंमळनेर, जि. जळगाव येथे पुस्तकांचं गाव निर्माण करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील मालगुंड-गणपुतीपुळे या गावांमध्ये पुस्तकांचे गाव सुरु करण्यात येणार आहे. तसेच मराठी भाषा विभागाच्या दिनांक १३.०९.२०२४ च्या शासन निर्णयान्वये ज्येष्ठ कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या जन्मगावी उभादांडा, ता. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग येथे कवितेचे गाव एक उपक्रम म्हणून कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच वि.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या मुळगावी शिरवाडे, जि. नाशिक येथे कवितेचे गाव तयार करण्यात येणार आहे.
तसेच ज्या जिल्ह्यांमध्ये अद्यापपर्यंत पुस्तकांचे गाव निर्माण करण्यात आलेले नाही, अशा जिल्ह्यांमधून प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्यावर मराठी भाषा विभागाच्या दिनांक ०४.०१.२०२२ च्या शासन निर्णयामध्ये नमूद निकष आणि अटी व शर्तीनुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) व (४) राज्याबाहेर पुस्तकांचे गाव व कवितेचे निर्माण करण्यात आलेले नाही. सद्यस्थितीत राज्यात पुस्तकांचे गाव /कवितांचे गाव ही योजना विस्तारीत स्वरुपात सुरु करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. तथापि राज्याबाहेर पुस्तकांचे/कवितांचे गाव सुरु करण्याबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येणार आहे. तसेच मराठी भाषा विभागाच्या दि.१४.०५.२०२२ व दि. ३०.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागात सन २०२२-२३ पासून "मराठी भाषा संस्कृती व विकास अर्थसहाय्य योजना" कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदर योजनेसाठी रु.१.००/- कोटीची तरतूद केली असून निवड झालेल्या प्रत्येक साहित्य संस्थेला रु.१०.००/- लक्ष इतक्या कमाल मर्यादेत अनुदान सहाय्य करण्यात येते. सदर उपक्रमांतर्गत सीमालगतच्या संस्थामध्ये विविध उपक्रम राबविण्यात येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

पंचायत समिती औसा (जि.लातूर) येथील प्रशासकीय इमारत विस्तारीकरण व नवीन कर्मचारी निवासस्थान बांधकाम करणेबाबत

(३१) १०२६१ (३०-०७-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचायत समिती औसा (जि.लातूर) येथील प्रशासकीय इमारत विस्तारीकरण करणे आणि कर्मचारी निवासस्थान अत्यंत जुने व जीर्ण झाले असल्याने सदरील नवीन कर्मचारी निवासस्थान बांधकाम करणे या कामाचे अंदाजपत्रकासह प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी अति.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांनी कक्ष अधिकारी ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई, यांच्याकडे सन २०२४ मध्ये सादर केले आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे मार्च, २०२५ मध्ये निवेदनाद्वारे मागणी केली आहे व याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश मा.ग्रामविकास मंत्री प्रधान सचिव ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना निर्देश दिले आहेत हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन सदर कामास निधीसह मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१०-०९-२०२५) : (१), (२) व (३) हे, खरे आहे.

पंचायत समिती औसा (जि. लातूर) येथील नविन प्रशासकीय इमारत व शासकीय निवासस्थान बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. प्रस्तुत प्रस्तावांमध्ये त्रुटी असल्याने परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर यांसदर्भात प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे जळकेवाडी (ता.कर्जत, जि.अहिल्यानगर) येथील स्कुल पंच कमिटीच्या जागेवर अंगणवाडी शाळेच्या अनधिकृत बांधकामाबाबत

(३२) ११०७८ (०८-०९-२०२५). डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जळकेवाडी (ता.कर्जत, जि.अहिल्यानगर) येथील गट नं.३८६ व ३८७ वर अंगणवाडी शाळेच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे जळकेवाडी येथील जि.प.शाळेचे बांधकाम गट नं.३८४ मध्ये करण्यात आले असून सदर गट नं.३८४ चे जागा मालक यांनी जि.प.शाळेचे अतिक्रमण काढून प्लॉट खुला करून देण्याची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी प्राथमिक विभाग, जि.प.अहिल्यानगर, गटविकास अधिकारी, गट शिक्षण अधिकारी यांना माहे जानेवारी, २०२५ मध्ये करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने गट विकास अधिकारी, गटशिक्षण कार्यालय, पंचायत समिति, कर्जत यांनी दि.२.५.२०२५ रोजी भूमी अभिलेख कार्यालयाकडून गट नं. ३८६ व ३८७ हा स्कुल पंच कमिटीच्या ७/१२ च्या नावे असलेल्या जागेची तात्काळ मोजणी करण्यात येऊन गट नं. ३८४ वर जि. प. शाळेचे बांधकाम झाले असल्यास सदरच प्लॉट मूळ मालक यांना अतिक्रमण निष्कासित करून खुला करून देण्यात येईल असे लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गट नं. ३८६ व ३८७ हा स्कुल पंच कमिटीच्या ७/१२ च्या नावे असलेल्या जागेची मोजणी शासनाच्या उप अधीक्षक, भूमी अभिलेख, ता.कर्जत याचेमार्फत अति तातडीने करण्यात येईल काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

कुमारी आदिती तटकरे (०७-११-२०२५) :(१) सदर बांधकाम सन २०१५-१६ मध्ये जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून मंजूर करण्यात आलेले आहे.

(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी पंचायत समिती यांनी संबंधितांना भूमी अभिलेख कार्यालयाकडून जागेची मोजणी करण्यात येईल असे कळविले होते. त्यानुसार भूमी अभिलेख कार्यालयाकडून दिनांक १९.०९.२०२५ रोजी मोजणी करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे तांबळडेग (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) येथील शासकीय विहीर विनापरवानगी तोडल्याबाबत

(३३) ११०८७ (३०-०७-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तांबळडेग (ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग) या गावातील ग्रामपंचायतीच्या हद्दी (दारसेवाडी) येथील स्वच्छ पिण्याच्या पाण्याची शासकीय विहीर विनापरवानगी नवीन बांधण्याच्या नावांखाली तोडण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विहिरीचे बांधकाम अद्याप केलेले नाही, तसेच सदर विहिरीसाठी शासनाने निधी उपलब्ध करून दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, सदर निधी कोणत्या कामासाठी वापरण्यात आला याची कोणती कारणे आहेत,

(५) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन विहीर तोडणाऱ्या ग्रामपंचायतीच्या संबंधित दोषी सदस्यांवर शासनाने कोणती

कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (३०-१०-२०२५) :(१) अशी बाब नाही.

(२) होय, हे अंशतः खरे आहे,

सदर विहिरीचे काम जल जीवन मिशन योजनेमधून मंजूर होते. केमिस्ट SDL ,कणकवली यांच्या कडून प्राप्त पाणी तपासणी अहवालाच्या अनुषंगाने सदर विहिरीचे पाणी मचूळ असल्यामुळे पाणी पिण्यायोग्य नसल्यामुळे विहिरीचे काम स्थगित करण्यात आलेले आहे. सदर विहिरीच्या कामासाठी शासनाकडून अदयाप निधी प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

पंचायत समिती दौंड (जि. पुणे) नवीन इमारत व अधिकारी कर्मचारी शासकीय निवासस्थान बांधकामास निधी मिळणेबाबत

(३४) ११३१९ (३०-०७-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि. पुणे) पंचायत समिती नवीन इमारत व अधिकारी कर्मचारी निवासस्थान बांधकाम करण्यासाठी १५ कोटी रुपयांचा निधी मिळणेबाबत मागणी मा. लोकप्रतिनिधी यांनी मा. ग्रामविकास मंत्री यांना दिनांक १४ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन पंचायत समितीची नवीन इमारत व अधिकारी कर्मचारी निवासस्थान बांधकामास निधी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१०-०९-२०२५) : (१) व (२) हे, खरे आहे.

पंचायत समिती दौंड (जि. पुणे) येथील नविन प्रशासकीय व अधिकारी कर्मचारी शासकीय निवासस्थान इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास अद्यापही अप्राप्त आहे. सबब, उक्त परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर यांसदर्भात प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वैद्यकीय महाविदयालयात “सेंटर ऑफ एक्सलन्स” स्थापन करणेबाबत

(३५) ११३३५ (३०-०७-२०२५). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीय क्षेत्रातील संशोधन वाढावे तसेच काही दुर्मिळ आजारावरील उपचाराची पद्धती विकसित व्हावी या करिता सदर महाविद्यालयामध्ये “सेंटर ऑफ एक्सलन्स” स्थापन करण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले हे खरेआहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाची व्याप्ती व स्वरूप काय आहे, तसेच या प्रकल्पात मुंबई महापालिकेचे वैद्यकीय महाविद्यालयाचा समावेश असणार आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१६-०९-२०२५) :(१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकल्पात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारितील शासकीय वैद्यकीय, दंत, आयुर्वेदिक तसेच होमिओपॅथी महाविद्यालयांचा समावेश करण्यात आला असून सदर संस्थांना वैद्यकीय शिक्षण, संशोधन व रुग्णोपचारासाठी जागतिक दर्जाच्या संस्थांमध्ये रुपांतरीत करून राज्यातील आरोग्य सेवा क्षेत्रात सर्वांगीण सुधारणा करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील जिल्हा परिषदांची देयके निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

(३६) ११८१८ (२९-०९-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३४ जिल्हा परिषदांची १९ हजारांवर विविध विभागांची देयके निधी अभावी प्रलंबित असल्याने विकासकामांवर परिणाम होत असल्याची बाब माहे मे-२०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन प्रलंबित देयकांचा आढावा घेऊन त्वरीत निधी जिल्हा परिषदांना देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१९-११-२०२५) :(१) राज्यातील ३४ जिल्हा परिषदांकडे विविध विभागांची निधी अभावी प्रलंबीत असलेल्या देयकांचा आढावा घेऊन सदर देयके सन २०२४-२५ व सन २०२५-२६ च्या अनुदानातून भागविण्यात येत आहेत.

(२) वित्त विभागाच्या दि.१४.०२.२०२५ च्या शासन निर्णयानुसार आभासी वैयक्तीक ठेव लेखा प्रणाली लागू करण्यात आली असून सदर प्रणालीद्वारे आहरीत केलेला निधी ३६५ दिवसात खर्च करण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यामुळे प्रलंबीत देयकांचा खर्च हा मागील वर्षात आहरीत केलेल्या निधीतून करता येईल. तसेच चालू वित्तीय वर्षात मंजूर केलेल्या अनुदानातून प्रलंबित देयके अदा करण्यात येत आहेत. त्याव्यतिरिक्तही काही देणी शिल्लक राहिल्यास आवश्यकतेनुसार पुरवणी मागणीद्वारे निधी मंजूर करून देयकाचा निपटारा करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

औसा आणि निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील दुर्गम भागातील गावात वाहतुकीच्या सोयी नसल्याबाबत

(३७) १२००७ (२५-०९-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा आणि निलंगा (जि.लातूर) तालुक्यातील हल्लाळी, बडूर, कासार बालकुंदा, कोराळी, कोराळी वाडी, सिरसी वाडी, आदी गावे दुर्गम व कर्नाटक सीमावर्ती भागात असून वाहतुकीच्या अपुऱ्या सुविधामुळे मागील अनेक वर्षापासून बहुतांश शाळेत शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेत शिक्षकांची रिक्त पदे असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुसार सदर भागात वाहतुकीच्या सुविधा पुरविणेबाबत तसेच विद्यार्थांचे होणारे शैक्षणिक नुकसान रोखणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (२९-१०-२०२५) : (१) (२) व (३) आगार व्यवस्थापक, निलंगा यांनी दिलेल्या माहितीनुसार हल्लाळी, बडूर, कासारबालकुंदा या गावात बसव्यवस्था आहे. तसेच कोराळी, कोराळीवाडी या गावात बस व्यवस्था सुरु करण्यात येणार असून, शिर्सीवाडी या गावात बसची सोय नाही.

तथापि, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी दि.३१.१.२०२५ रोजी तालुकास्तरावरुन झालेल्या समायोजनाव्दारे व तात्पुरत्या व्यवस्थेने संबंधित शाळांमध्ये बहुतांश शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्यात आल्या आहेत. परंतू या शाळांमध्ये काही शिक्षकांनी उपस्थित न होता मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेल्या आहेत. त्यामुळे सद्य:स्थितीत या शाळेतील ही पदे रिक्त दाखविण्यात आली असून, तात्पुरत्या व्यवस्थेने येथे शिक्षक पाठविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

नागपूर येथील एम्स व धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्यातील सामंजस्य कराराचा (MOU) मसुद्यास मान्यता मिळणेबाबत

(३८) १२०६७ (०८-०९-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव जिल्ह्यातील रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतीचे शिक्षण मिळावे यासाठी नागपूर येथील एम्सच्या धर्तीवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव चे आधुनिकीकरण करण्याच्या अनुषंगाने सामंजस्य करार करण्यात येत आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, नागपूर एम्सच्या व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव यांच्यातील सामंजस्य कराराच्या (MOU) मसुद्याला मान्यता मिळणेबाबत चा प्रस्ताव अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव यांनी दिनांक १४ मे,२०२५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मान्यतेसाठी पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करून मान्यतेचा प्रस्ताव आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्याकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर सामंजस्य करार होण्याच्या दृष्टीने स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२५) :(१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, पत्र क्र.संकीर्ण - ०६२५/ प्र.क्र. २२४/ प्रशा-२ दिनांक ०७.०७.२०२५ अन्वये अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान, नागपूर व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,धाराशिव यांच्यामध्ये Non Financial सामजंस्य करार करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांचे गुणांकन करून सरळसेवेने नियुक्ती करण्याबाबतच्या निर्णयात अंशत: बदल करण्याबाबत

(३९) १२०६८ (३०-०७-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांचे गुणांकन करून सरळसेवेने नियुक्ती शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६ दि.३०.०१.२०२५ नुसार करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णयात अंशत: बदल करण्याबाबत अंगणवाडी मदतनीस व स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नियुक्ती मध्ये खास करून २ वर्षे पूर्ण झाली आहेत अशांनाच ही संधी मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६ दि.०२.०२.२०२३ नुसार राज्यातील बऱ्याच अंगणवाडी मदतनीस यांनी अंगणवाडी सेविकेचे काम पाहिलेले तसेच शासनाने सुरू केलेल्या "मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण" योजनेमध्ये देखील मोठ्या प्रमाणात काम केलेले मदतनीस व सन २०२२-२३ मध्ये भरती झालेल्यांना न्याय मिळवा यासाठी उपरोक्त शासन निर्णयात अंशत: बदल करावा अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (०७-११-२०२५) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय, दिनांक २.२.२०२३ नुसार अंगणवाडी मदतनीस मधून अंगणवाडी सेविका पदी थेट नियुक्ती देताना २ वर्षे सेवा पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे. तसेच अंगणवाडी सेविका / मदतनीस पदे ही सरळसेवेने भरताना अंगणवाडी सेविका /मदतनीस म्हणून कमीत कमी २ वर्षांचा अनुभव असल्यास ०५ गुण देण्याचे प्रावधान आहे.

(४) हे खरे आहे.

(५) अंगणवाडी मदतनीस यांना अंगणवाडी सेविका पदावर नियुक्ती करताना अंगणवाडी मदतनीस पदाचा २ वर्षाचा अनुभव असण्याची अट यापुर्वीदेखील होती. त्यानुसार पदभरती करण्यात आलेली आहे. तसेच सरळसेवेने नियुक्तीकरिता अतिरिक्त गुण अनुज्ञेय करण्यात आले असल्याने अनुभवाची किमान २ वर्षाची अट योग्य असून त्यामध्ये सुधारणा करण्याची बाब विचाराधीन नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील लाभार्थ्यांना बालसंगोपन योजनेंतर्गत अनुदान मिळालेले नसल्याबाबत

(४०) १२९२१ (०८-०९-२०२५). श्री.गजानन लवटे (दर्यापूर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिला व बालविकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या "बालसंगोपन" योजनेतर्गत दर महिन्याला अनाथ बालकाच्या पालनकर्त्यांना रु. २२५० रुपये अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहे ऑगस्ट, २०२४ पासून सदर अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने माहिती घेऊन सदर थकित अनुदान तातडीने अदा करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (०६-११-२०२५) : (१) होय, हे खरे आहे,

(२) व (३) हे खरे नाही,

अमरावती जिल्हयामध्ये बालसंगोपन योजनेचा लाभ घेणाऱ्या ५१७२ लाभार्थ्यांना मार्च २०२५ पर्यंतचा लाभ अदा करण्यात आला असून उर्वरीत निधी वितरीत करण्यासाठी पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

बोरी-महागाव ते अर्जुनी-मोरगाव (जि.गोंदिया) रस्ता दुरुस्त करण्याबाबत

(४१) १२९५३ (२५-०८-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरी-महागाव ते अर्जुनी-मोरगाव (जि.गोंदिया) हा जवळपास १५-२० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात सततची वाहतूक व वर्दळ असल्यामुळे या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील नागरिकांना प्रवास करण्यास अनेक समस्या निर्माण झाल्या असल्याने स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी रस्ता दुरुस्तीसाठी शासनास वारंवार निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्यांवर वारंवार अपघात होत असून रात्रीचा प्रवास करणे धोक्याचे आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन रस्त्यावरची वाहतुकीची वर्दळ, प्रवाशांना होणारा त्रास लक्षांत घेऊन तात्काळ रस्ता दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (३१-१०-२०२५) : (१),(२),(३) व (४) रस्ते विकास आराखडा सन २००१-२१ नुसार मोरगांव-अर्जुनी तालुक्यातील बोरी-महागाव ते अर्जुनी-मोरगांव हा रस्ता इतर जिल्हा मार्ग क्र.१२० दर्जाचा असून सदर रस्त्याची एकूण लांबी २६.०० कि.मी. इतकी आहे.

सन २०२४-२५, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सदर रस्त्याच्या सा.क्र.१५/०० ते १८/०० व सा.क्र.२०/०० ते २२/०० या लांबीमध्ये रु.५०.०० लक्षचे काम मंजूर असून ते प्रगतीत आहे.

तसेच सन २०२५-२६ मध्ये सदर रस्त्याच्या दुरुस्तीचे रु.५०.०० लक्षचे काम जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे.

उर्वरित नादुरुस्त लांबीचे काम जिल्हा परिषदेस रस्ते व पूल दुरुस्तीच्या विविध योजनेतून प्राप्त होणाऱ्या निधीमधून घेण्याच्या सूचना देण्यात आले असून निधीच्या उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

पंढरपूर येथे विठुमाऊलीच्या वारीला पालखी सोहळ्यात येणाऱ्या वारकऱ्यांची गैरसोय रोखणेबाबत

(४२) १३०६९ (३०-०७-२०२५). श्री.रविशेठ पाटील (पेण) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर येथे विठुमाऊलीच्या वारीला पालखी सोहळयात येणाऱ्या वारकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी स्वच्छ, शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासह पालखी मार्गावरील रस्ते, पालखीतळ दुरुस्तीचे काम हे जलदगतीने करण्याचा महत्वकांक्षी निर्णय मा. ग्रामविकास मंत्र्यांनी माहे मे, २०२५ मध्ये घेतल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालखी मार्गावरील रस्ते दुरुस्तीच्या अडचणीवर कायमस्वरूपी मार्ग काढण्यासाठी 'मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून' निधी उपलब्ध करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा. मंत्री महोदयांनी दोन महिन्यात प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले असताना आदेशांचे पालन करण्यात आले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. जयकुमार गोरे (२८-०८-२०२५) :(१) होय, हे खरे आहे. ग्रामविकास विभागामर्फत आषाढी एकादशी-२०२५ च्या निमित्ताने पालखी मार्गावरील जिल्हा परिषदांच्या अखत्यारीतील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी लेखाशीर्ष ३०५४-२४१९ अंतर्गत दि.२१.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये १६ रस्ते कामांना डांबरीकरण/खडीकरण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

(२) व (३) अशंत: खरे आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील खालील पालखी मार्गावरील रस्त्यांची देखभाल दुरुस्ती करण्यात आलेली असून सदर मार्ग सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे.

१. पंढरपूर ते पिराची कुरोली माळखांबी पालखी मार्ग भाग-१ सा.क्र.०/००० ते २०/५००, ता. पंढरपूर

२. पंढरपूर ते पिराची कुरोली माळखांबी पालखी मार्ग भाग-२ सा.क्र.२०/५०० ते २८/८००, ता. माळशिरस

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गावातील रस्ते दुरुस्त करण्यासाठी ग्रामविकास विभाग दुर्लक्ष करत असल्याबाबत

(४३) १३०७० (३०-०७-२०२५). श्री.रविशेठ पाटील (पेण) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थानिक ग्रामपंचायतीना गावातील रस्ते सुधारावेत, खड्डेमुक्त करावेत म्हणून वारंवार सूचना देऊनही त्यात सुधारणा होत नसल्याने महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने ज्या गावात चांगला रस्ता नाही त्या गावात एस. टी. बस सेवा न देण्याचा निर्णय घेतल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खड्डेमय प्रवास करावा लागत असल्याने एस.टी.चे होत असलेले मोठे नुकसान तसेच अपघाताची भीती या दृष्टीने घेण्यात आलेला हा निर्णय एका बाजूने योग्य असे खड्डेमय असलेले रस्ते चांगले बनविण्यासाठी ग्रामविकास विभाग दुर्लक्ष करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत असे खड्डेमय असलेले रस्ते दुरुस्ती करून किती गावात एस.टी. सेवा पूर्ववत करण्यामध्ये विभागाला यश मिळाले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (३१-१०-२०२५) : (१), (२) व (३) राज्यातील ग्रामीण भागातील रस्ते नादुरुस्त असल्याच्या कारणास्तव कोणत्याही मार्गावरील बससेवा बंद करण्याचा निर्णय राज्य परिवहन महामंडळाने घेतलेला नाही.

राज्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीकरिता रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (लेखाशिर्ष ३०५४-२४१९), जिल्हा वार्षिक योजना (३०५४/५०५४), प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, आदिवासी उपयोजना, बिरसा मुंडा जोडरस्ते योजना, इ. योजनांतर्गत शासनाकडून निधी उपलब्ध करुन

देण्यात येतो. सदर निधीमधून ग्रामीण रस्त्यांची दुरुस्ती/दर्जोन्नती करुन रस्ते वाहतुकीस योग्य स्थितीत ठेवण्याची कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील क्रमांक नसलेल्या विविध भागातील रस्त्यांना नवीन क्रमांक देणेबाबत

(४४) १३३८७ (२५-०९-२०२५). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नंबर नसलेला रस्ता ही एक खूप मोठी समस्या निर्माण होत असल्याने दळणवळणाची मोठी अडचण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्त्याला क्रमांक नसल्याने सदर रस्त्यारला निधी वितरीत करता येत नाही, अशा रस्त्यांवर खड्डे पडल्यामुळे प्रवास करणे कठीण होत असून रस्त्याचे बांधकाम योग्य पद्धतीने नसल्याने स्थानिक नागरिकांना अडचणी निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्रमांक नसलेल्या रस्त्यांच्या ठिकाणी पाऊस, पूर किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे दिवसेंदिवस दुरवस्था होत असून मागील अनेक वर्षांपासून राज्यातील विविध मतदारसंघासह परतूर या मतदारसंघातील रस्त्यांना नवीन क्रमांक देण्यात यावा यासाठी मागणी केली असूनही अद्याप त्यास मंजूरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने राज्यातील क्रमांक नसलेल्या विविध रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत व विविध भागातील रस्त्यांना नवीन क्रमांक देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१४-१०-२०२५) :(१), (२) व (३) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्र.जिपर-२०२३/प्र.क्र.०१/बांधकाम-५, दिनांक ४.१२.२०२३ अन्वये राज्यातील अवर्गीकृत/योजनाबाह्य रस्त्यांना ग्रामीण मार्गाचा दर्जा देण्याबाबत व ग्रामीण मार्गांना इतर जिल्हा मार्ग म्हणून दर्जोन्नती देण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त होणारे प्रस्ताव तपासून विहित निकषांची पुर्तता करणाऱ्या रस्त्यांना ग्रामीण मार्ग/इतर जिल्हा मार्ग म्हणून घोषित/दर्जोन्नत करण्याची कार्यवाही करण्यात येते. तसेच जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यातील निकषांची पुर्तता करणारे एकूण १०१.७ किमी लांबीचे योजनाबाह्य रस्ते ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.रवियो-२०२५/प्र.क्र.४२/बांधकाम-५, दि.३ सप्टेंबर, २०२५ नुसार ग्रामीण मार्ग म्हणून रस्ते विकास योजना सन २००१-२१ मध्ये समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

चिखलदरा तालुक्यातील अंगणवाडयामध्ये महिला व बालविकास अधिकाऱ्यांनी नियमित हजर राहणेबाबत

(४५) १३८१८ (०८-०९-२०२५). श्री.गजानन लवटे (दर्यापूर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिला व बालविकास अधिकाऱ्यांकडे एकाच वेळी चिखलदरा व अचलपूर या दोन तालुक्यांचा कारभार देण्यात आला असल्याने त्यांच्याकडून चिखलदरा तालुक्यातील अंगणवाड्यांकडे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अधिकारी चिखलदरा मुख्यालयात हजर राहत नसल्यामुळे कुपोषीत बालकांची देखरेख, तपासणी, निरीक्षण होत नसल्याने गेल्या तीन महिन्यात तालुक्यातील कुपोषणात १८ टक्क्यांनी वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन चिखलदरा येथे नियमित हजर राहणे व कुपोषणाचे वाढते प्रमाण कमी करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (१०-११-२०२५) :(१), (२) व (३) हे खरे नाही.

बाल विकास प्रकल्प अधिकारी, चिखलदरा यांचेकडे बाल विकास प्रकल्प अधिकारी, अचलपूर या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. संबंधित अधिकाऱ्यामार्फत सोमवार आणि शुक्रवार या दिवशी चिखलदरा प्रकल्पाचे कामकाज पाहिले जाते. मंगळवारी अचलपूर प्रकल्पाचे कामकाज पाहिले जाते. उर्वरित दोन दिवस (बुधवार व गुरुवार) अंगणवाडी भेटी दिल्या जात असल्यामुळे अंगणवड्यांकडे दुर्लक्ष होत नाही.

मागील ३ महिन्यांमधील चिखलदरा तालुक्याचे पोषण ट्रॅकर ॲप्लीकेशन नुसार पोषण स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

कालावधी	वजन आणि उंची घेतलेल्या बालकांची संख्या		सॅम बालके (SAM)		%	मॅम बालके (MAM)	%
जुलै, २०२५	९८६८	९०	०.९१	७६०	७.७		
ऑगस्ट, २०२५	९७७२	७१	०.७३	६२३	६.३८		
सप्टेंबर,२०२५	९६९७	५७	०.५९	५८९	६.०७		

वरील विवरणपत्रानुसार असे लक्षात येते की, चिखलदरा तालुक्यात कुपोषणाचे प्रमाण हे १८ टक्क्यांपेक्षा खुप कमी आहे.

कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-
१) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता यांना THR तर ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.
२) तसेच, आदिवासी प्रकल्पामध्ये भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु असून ह्या योजने अंतर्गत गरोदर महिला व स्तनदा माता यांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो. तसेच, ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवडयातून ४ दिवस अंडी/केळी देण्यात येतात. या ४ दिवसांमध्ये शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी तर मांसाहारी बालकांना प्रति दिन १ अंडे देण्यात येते.
३) तसेच, राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम/नागरी बाल विकास केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत. ग्राम/नागरी बाल विकास केंद्रामध्ये सॅम बालकांना तीन वेळा Energy Dense Nutritious Food चा पुरवठा करण्यात येतो तसेच आवश्यकतेनुसार औषधोपचार करण्यात येतो.
४) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जनआंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील दिव्यांग उमेदवारांची फेर वैद्यकीय चाचणी करण्याचे आदेश दिल्याबाबत

(४६) १३८२३ (२५-०९-२०२५). श्री.गजानन लवटे (दर्यापूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बनावट दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे दिव्यांग प्रवर्गातून नोकरी मिळविण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढले असून अमरावती जिल्ह्यातील दिव्यांग उमेदवारांची फेर वैद्यकीय चाचणी करण्याचे आदेश शासनाने जिल्हा परिषद प्रशासनाला दिले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने दिव्यांग उमेदवारांची फेर वैद्यकीय चाचणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, शासन निर्णयानुसार बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे नियुक्ती किंवा पदोन्नती मिळविणारे किती अधिकारी/कर्मचारी आढळून आले आहेत व त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१८-११-२०२५) :(१), (२) व (३) दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि.२४.४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिव्यांग प्रवर्गातून नोकरी मिळविलेल्या उमेदवारांची फेर वैद्यकीय तपासणी करुन खोट्या प्रमाणपत्र धारक उमेदवारांवर कारवाई करणेबाबत सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे. दिव्यांग कल्याण विभागाकडून प्राप्त संशयास्पद दिव्यांग प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांची यादी ग्रामविकास विभागाकडून जिल्हा परिषदांना पाठविण्यात आली होती.

दिव्यांग कल्याण विभाग परिपत्रक दि.१६.८.२०२४ नुसार संबंधित उमेदवाराची वैद्यकीय तपासणी वैद्यकीय मंडळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांचेकडून करण्यात आली आहे. सदर उमदेवाराच्या UDID प्रमाणपत्राची खातरजमा/ पडताळणी सक्षम प्राधिकारी यांचेकडून करण्यात आली आहे. जिल्हा शल्य चिकित्सक, वाशिम यांनी निर्गमित केलेले दिव्यांग प्रमाणपत्र व त्यानंतर वैद्यकीय मंडळ, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांचेकडून करण्यात आलेली वैद्यकीय तपासणी अहवालाचे आधारे सदर उमदेवाराचे दिव्यांग प्रमाणपत्रात कोणताही खोटेपणा आढळून आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ससून सर्वोपचार रुग्णलय, पुणे येथे अपंगत्वाच्या दाखल्यासाठीचे अर्ज प्रलंबित असल्याबाबत.

(४७) १३९४५ (०८-०९-२०२५). श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्याच्या ससून सर्वोपचार रुग्णालयात अपंगत्वाच्या दाखल्यासाठी मागील वर्षभरापासून सात हजार अर्ज प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांना तपासणीसाठी व तपासणीनंतर करावी लागत असलेली प्रतीक्षा, रुग्णालयावर येणारा कामाचा अधिकचा भारामुळे होणारा विलंब लक्षात घेता अपंगत्वाच्या प्रमाणपत्रासाठी आणखी काही शासकीय रुग्णालयामध्ये सोय करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१०-११-२०२५) :(१) नाही.

(२) ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे या संस्थेत मागील वर्षात (सन २०२४) मध्ये दिव्यांगत्वाच्या दाखल्यासाठी एकुण प्राप्त अर्जाची संख्या १२५३० इतकी होती. त्यापैकी ११०४४ एवढे अर्ज निकाली काढण्यात आलेले आहेत, तसेच कार्यवाही चालू असलेल्या अर्जाची संख्या ही एकूण १४८६ एवढी आहे. प्रलंबित अर्जांचा तातडीने निपटारा करण्यात येतो. ससूनमध्ये दर बुधवार व शुक्रवारी ऑनलाईन दिव्यांगत्वाची प्रमाणपत्रे देण्याचे काम पूर्ण गतीने चालू आहे. याकरिता स्वतंत्र कक्ष कार्यान्वित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

महिला व बालविकास विभागाचे अधिनस्त कार्यालयात गट अ व ब संवर्गातील पदे रिक्त असल्याबाबत

(४८) १४०२९ (०८-०९-२०२५). श्रीमती सरोज अहिरे (देवळाली) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीची कार्यवाही १०० दिवसांचे कालावधीमध्ये जलदगतीने करण्याचे सन २०२५ मध्ये मा.मुख्यमंत्री यांनी निदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला व बालविकास विभाग आयुक्तालय व आयुक्त,एकात्मिक बालविकास या कार्यालयातील आस्थापना मंडळ व विभागीय पदोन्नती समितीच्या अखत्यारितील संवर्गातील गट अ व ब पदोन्नतीची पदे रिक्त असल्याने दिनांक १ ऑगस्ट,२०१९ च्या शासन निर्णयातील पदोन्नतीच्या मार्गदर्शक तत्वानुसार दिनांक १० फेब्रुवारी,२०२५ रोजी पर्यंत प्रस्ताव सादर करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असे असताना, सदर विभागातील पदोन्नतीचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आले नसल्याचे दिनांक ६ फेब्रुवारी,२०२५ (अमुस) रोजी निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, महिला व बालविकास विभागाचे अधिनस्त कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गट अ व ब पदोन्नती प्रस्तावाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

कुमारी आदिती तटकरे (०९-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०१.०८.२०१९ मधील परिशिष्ठ ३ मध्ये विहीत केल्यानुसार प्रत्येक वर्षी ३० नोव्हेंबर पर्यंत संबंधित संवर्गाच्या पदोन्नतीच्या निवडसूच्या अंतिम करून पदोन्नतीची कार्यवाही करण्याच्या मार्गदर्शक सूचना आहेत. गट-ब संवर्गातील निवडीने नियुक्तीच्या कोट्यातील २५८ रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत मर्यादित विभागीय परिक्षेद्वारे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास दि.०४.०३.२०२५ रोजी मागणीपत्र पाठविण्यात आले आहे.

आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी दि.०३.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये गट-ब संवर्गातून गट-अ संवर्गातील बाल विकास प्रकल्प अधिकारी व तत्सम रिक्त पदांवर पदोन्नती देण्याकरीता विचार क्षेत्रातील अधिकाऱ्यांचा प्रस्ताव सादर केला होता. तद्नुषंगाने सदर प्रस्ताव विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशीसह सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आला होता. त्यास सामान्य प्रशासन विभागाने मान्यता दिल्यानुसार शासनाच्या मान्यतेने पदोन्नतीचे आदेश निवडसूची वर्षात निर्गमित करण्यात आले आहे.

तसेच उपआयुक्त या पदावर पदोन्नतीच्या विचारक्षेत्रातील श्री.दत्तात्रय मुंडे व विभागातील इतर ४ अधिकाऱ्यांनी त्यांच्या ग्राम विकास विभागाकडील सेवाजेष्ठतेत सुधारणा झाल्याच्या अनुषंगाने केलेल्या विनंतीनुसार सेवाजेष्ठता दिनांकामध्ये बदल झाल्याने सन २०१४ ते २०२४ पर्यंतच्या सेवाजेष्ठतासुच्या सुधारित करण्यात आल्या होत्या. तद्नंतर आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी अनुक्रमे दि.०३.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये गट-अ संवर्गातील उपआयुक्तांची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याचा प्रस्ताव सादर केला होता. तद्नुषंगाने सदर प्रस्ताव विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशीसह सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आला होता. त्यास सामान्य प्रशासन विभागाने मान्यता दिल्यानुसार शासनाच्या मान्यतेने पदोन्नतीचे आदेश निवडसूची वर्षात निर्गमित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वसमत (जि.हिंगोली) येथे अंगणवाडी केंद्रच्या संख्येत वाढ करणेबाबत

(४९) १४६१२ (०८-०९-२०२५). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत (जि.हिंगोली) शहराची लोकसंख्या १ लाख असून शहरात फक्त १५ अंगणवाडी असल्याचे दिनांक १३

जून, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या निर्णयानुसार ८०० ते ९०० लोकसंख्येमागे १ अंगणवाडी अस्तित्वात असावी असे असताना शहरात १ लाख मतदार असल्यामुळे येथे आणखी जवळपास ६० अंगणवाडयांची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबत बालविकास एकात्मिक प्रशासनाने यापूर्वीच शासनाकडे मागणी केली असून मा.लोकप्रतिनिधी यांनीही शासनाकडे तशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबबात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

कुमारी आदिती तटकरे (०७-११-२०२५) : (१), (२), (३) व (४) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. सदर योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्राच्या संख्येमध्ये वाढ करण्याकरिता केंद्र शासनाची मान्यता आवश्यक आहे. राज्यात नवीन अंगणवाडी सुरू करण्यासंदर्भात केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन सुधारित प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र मेडिकल काऊन्सिल (MMC) ने होमिओपॅथी डॉक्टरांना MMC अंतर्गत नोंदणीस पात्र ठरवणेसंदर्भातील निर्णयाबाबत

(५०) १५४३८ (१९-०८-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.रामदास मसराम (आरमोरी) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र मेडिकल काऊन्सिल (MMC) ने दिनांक ३० जून २०२५ रोजी परिपत्रक क्रमांक MMC/CCMP Registration/ २०२५/०३८६६ अन्वये ‘सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकोलॉजी (CCMP)’ पूर्ण केलेल्या होमिओपॅथी डॉक्टरांना MMC अंतर्गत नोंदणीस पात्र ठरवले असल्याच्या निर्णय कोणत्या कायद्याच्या किंवा नियमावलीच्या आधारे घेण्यात आला आहे,
(२) असल्यास, होमिओपॅथिक डॉक्टर हे स्वतंत्र प्रणालीचे प्रतिनिधी असून त्यांच्यासाठी स्वतंत्र परिषद (Maharashtra Council of Homeopathy) अस्तित्वात असताना त्यांना MMC मध्ये नोंदणीची मुभा देण्याचा उद्देश काय आहे,
(३) असल्यास, इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA), लातूरने या निर्णयावर तीव्र चिंता व्यक्त केली असून, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद ही केवळ वैध एमबीबीएस (MBBS) आणि त्यावरील पदवी प्राप्त करणाऱ्या डॉक्टरांसाठीच आहे, असे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, CCMP हा फक्त ६ महिन्यांचा अल्पकालीन अभ्यासक्रम असून, तो संपूर्ण एमबीबीएस शिक्षणाची समकक्षता सिद्ध करू शकत नसल्याने इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA), लातूरने या निर्णयावर आक्षेप घेतला असून त्यांनी महाराष्ट्र वैद्यकीय परिषद ही केवळ वैध एमबीबीएस (MBBS) आणि त्यावरील पदवी प्राप्त करणाऱ्या डॉक्टरांसाठीच असल्याने या ‘अन्यायकारक’ निर्णयात त्वरित लक्ष घालून तो मागे घेण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अशाप्रकारे ‘लॅटरल एंट्री’ स्वरूपात होमिओपॅथिक डॉक्टरांना MMC मध्ये सामावून घेणे हे रुग्णांच्या सुरक्षिततेला आणि सार्वजनिक आरोग्यास गंभीर धोका निर्माण करू शकते, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (११-११-२०२५) :(१), (२) व (३) राज्यातील नोंदणीकृत होमिओपॅथी वैद्यकीय व्यावसायिकांना आधुनिक वैद्यक शास्त्रात व्यावसाय करण्याच्या अनुषंगाने अधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाने शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र. एमएचसी-२०१४/प्र.क्र.३०८/१४/शिक्षण-२, दि.१३.०८.२०१४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. CCMP हा अभ्यासक्रम एक वर्षाचा असून तो महाराष्ट्र आरोग्य

विज्ञान विद्यापिठाच्या आधुनिक चिकित्सा पध्दतीच्या क्लिनिकल बोर्ड, फॅकल्टी ऑफ मेडिसीन यांनी तयार केला असून त्यास विद्यापिठाच्या विद्या परिषद व व्यवस्थापन परिषदेने ही मान्यता दिली आहे. त्यानुसार सदरहु अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या होमिओपॅथिक वैद्यकीय परिषदमध्ये नोंदणी करण्याचे अनुषंगाने शासनाने दि. २५.०६.२०१४ अन्वये अधिसूचना निर्गमित केली आहे. शासन अधिसूचना दि.२५.०६.२०१४ नुसार महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने "सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फार्माकोलॉजी (CCMP)" पुर्ण केलेल्या होमिओपॅथी डॉक्टरांना MMC अंतर्गत नोंदणीस पात्र ठरवले आहे .

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

(६) प्रश्न उद्भवत नाही

विधान भवन :
नागपूर.

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.